**महाराष्ट्र शासन**

दूरध्वनी - (०२२) २२८५५०८२
Email:env.mantra@gmail.com

इएनव्ही-२०१६/प्र.क्र.२८/तां.क-३
पर्यावरण विभाग, मंत्रालय
नवीन प्रशासन भवन, १५ वा मजला
मादाम कामा मार्ग,
मुंबई- ४०००३२
दिनांक- २०.७.२०१६

प्रति,

सह सचिव,
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई

सहसचिव,
नियोजन विभाग,
मंत्रालय, मुंबई

कक्ष अधिकारी,
वित्त विभाग,
मंत्रालय, मुंबई

उप सचिव,
अर्थसंकल्प, पर्यावरण विभाग
वरळी, मुंबई

विषय :- हरित संकल्पना योजनेंतर्गत दिनांक ११ जुलै, २०१६ रोजी सुकाणू समितीच्या झालेल्या बैठकीचे इतिवृत्त

महोदय/महोदया,

हरित संकल्पना योजनेंतर्गत प्रधान सचिव (पर्यावरण) यांच्या अध्यक्षतेखाली सुकाणू समितीची बैठक दिनांक ११ जुलै, २०१६ रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीचे इतिवृत्त माहितीस्तव सोबत जोडण्यात आले आहे.

आपली,

अर्चना शिर्के

(अर्चना शिर्के)

शास्त्रज्ञ-२

OIC
२०/७/१६

सहपत्र- वरिलप्रमाणे

प्रत माहितीस्तव -

प्रधान सचिव (पर्यावरण), मंत्रालय, मुंबई-३२.

**हरित संकल्पना (Green Ideas ) योजनेंतर्गत गठीत सुकाणू समितीच्या बैठकीचे इतिवृत्त**

दिनांक ११ जुलै, २०१६ रोजी हरित संकल्पना या कार्यक्रमांतर्गत प्रधान सचिव ( पर्यावरण) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सुकाणू समितीच्या बैठकीत खालील अधिकारी उपस्थित होते.

१) श्री. अविनाश पाटील, सह सचिव, नगर विकास विभाग - सचिव
२) श्री. चारुशीला तांबेकर, सहसचिव, नियोजन विभाग - सदस्य
३) श्री. महेंद्र हजारी, उप सवि, आस्थापना, पर्यावरण विभाग - सदस्य
४) श्रीम. स्वप्ना निलेश देशपांड, कक्ष अधिकारी, वित्त विभाग - सदस्य
५) श्री. अ.म. पिंपरकर, शास्त्रज्ञ-१, पर्यावरण विभाग - सदस्य सचिव

सदर बैठकीत प्रथमतः योजनेच्या प्रगतीबाबत तसेच योजनेच्या स्वरुपाबाबत चर्चा करण्यात आली. दिनांक १ जुलै, २०१५ ते १० जुलै, २०१६ या कालावधीत योजनेंतर्गत प्राप्त झालेले सर्व प्रस्ताव समितीसमोर विचारार्थ ठेवण्यात आले.

तसेच विचाराधीन योजनेंतर्गत विभागास नाविन्यपूर्ण, गुणवत्तापूरक प्रस्ताव प्राप्त होत नसल्याचे तसेच प्राप्त होणा-या प्रस्तावांची संख्या व गुणवत्ता पहाता योजनेचा मूळ उद्देश साध्य होत नसल्याचे प्रकर्षाने निदर्शनास आल्याचे सुकाणू समितीस अवगत करण्यात आले. उपरोक्त बाबी लक्षात घेता तसेच सुकाणू समितीच्या कार्यकक्षेंतर्गत नमूद मुद्या क्र.५ नुसार योजनेच्या स्वरुपात बदल करण्याबाबत सुकाणू समितीसमोर प्रस्तावित करण्यात आले. उपरोक्त बाबत सविस्तर चर्चा करुन सुकाणू समितीने घेतलेला निर्णय पुढीलप्रमाणे –

➢ खालील बाबींचा समोवश असलेला योजनेचा मूळ स्वयंस्पष्ट, अटी ,शर्ती, निकष व पात्रता ठरवणारा शासन निर्णय शासनाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात यावा.

- योजनेची नाविन्यपूर्ण संकल्पना सादर करण्याची बाब तशीच ठेवण्यात यावी. सदर बाबत विषय खुला ठेवण्याबाबत निर्णय घेण्यात आला.
- "नाविन्यपूर्ण हरित संकल्पनेची अंमलबजावणी मुख्यत्वे **सहभागातून अंमलबजावणी" या सूत्रावर आधारित राहिल**, तसेच **जनजागृती ही त्यातीलच एक अंतर्भूत बाब** असावी.
- प्रस्तावधारकाने प्रस्तावित संकल्पनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी किमान सहा महिन्याच्या कालावधीसाठी केलेली असली पाहिजे.
- जो विषय निवडलेला आहे त्यात **प्रचलित पध्दती व्यतिरिक्त नाविन्यपूर्ण संकल्पना** अपेक्षित आहे. जसे घनकच-याचे स्थानिक स्तरावर व्यवस्थापन असा विषय/ संकल्पना असल्यास त्यात गांडूळखत निर्मिती प्रकल्प असे प्रचलित प्रकल्प अपेक्षित नाही. या ऐवजी कच-याचे घरगुती स्तरावर १००% (dispose) नष्ट होऊ शकेल अशा

उपकरणांची/ प्रक्रिया यंत्राची निर्मिती वा वापर असे प्रस्ताव अपेक्षित. विभागामार्फत उदाहरणादाखल "Idea Bank" तयार करुन संकेतस्थळावर उपलब्ध करुन द्यावे.

- प्रस्तावांच्या अंमलबजावणीच्या संनियंत्रणासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचे सहाय्य घेण्यात यावे.
- प्रस्ताव सादर करतेवेळी सुध्दा महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून मान्यतेनंतर सादर करण्याबाबत हरकत नसावी.
- प्रस्तावाच्या अनुषंगाने **प्रस्तावित एकूण खर्चात प्रस्तावधारकाचा/ संस्थेचा २५ % हिस्सा** असेल म्हणजेच योजनेंतर्गत प्रस्तावासाठी आर्थिक सहाय्य **७५:२५** असे असेल.
- निधीच्या उपलब्धतेनुसार दरवर्षी एकूण प्रस्तावाच्या खर्चाची मर्यादा ठरविण्यात येईल. योजनेंतर्गत प्रस्ताव सादर करण्याची घोषणा –दिनांक ५ जून रोजी " पर्यावरण दिना" निमित्त आयोजित समारंभाच्या वेळी करण्यात यावी.
- प्रस्ताव सादर करण्याचा शेवटचा दिनांक – ३० सप्टेंबर.
- सुयोग प्रस्तावांच्या निवडीबाबत गठीत सुकाणू समितीमार्फत निर्णय घेण्यात यावा.

➢ दिनांक १ जुलै, २०१५ ते १० जुलै, २०१६ या कालावधीत योजनेंतर्गत प्राप्त झालेले सर्व प्रस्ताव योजनेच्या मूळ स्वरुपात बदल करण्यात आल्याने तसेच वित्तीय तरतुदीची उपलब्धता पहाता अमान्य करुन योजनेच्या अनुषंगाने झालेला निर्णय संकेतस्थळावर उपलब्ध करुन द्यावा.

उपस्थितीतांचे आभार मानून बैठक समाप्त झाली.

.............................................